# ५. मोटार वाहन जप्त केल्यानंतर ते सोडविण्याकरिता काय कराल



मुंबई मोटार वाहन कर कायदा, १९५८ नुसार वाहनाचा वापर रस्त्यावर करण्यापूर्वी वाहन धारकांनी आपल्या वाहनाचा कर भरणा केलेला असावा व त्याचा पुरावा सोबत ठेवणे बंधनकारक आहे. वाहनाचा रस्त्यावर वापर करताना कराचा भरणा केला नसल्यास मोटार वाहन विभागातील मोटार वाहन निरिक्षक व त्यावरील अधिका-यांना मोटार वाहन कायदा, १९५८ च्या कलम १२ ब नुसार वाहन जप्त करण्याचे अधिकार आहेत.

कराचा भरणा नियमानुसार न केल्यामुळे ३० दिवसानंतर वाहन जप्त करता येते व ते पोलिस स्टेशन किंवा आर.टी.ओ. कार्यालयात अटकावून ठेवण्यात येते.

९० दिवसापेक्षा थकित कर असलेल्या वाहनधारकाविरुध्द न्यायालयीन कारवाई करता येते. वाहन जप्त केले असल्यास थकित कराचा भरणा केल्यानंतर कराधान अधिकाऱ्यास जप्त केलेले वाहन सोडून देण्याचे अधिकार आहेत.

कराच्या भरणा व्यतिरिक्त विधीग्राह्य अनुज्ञप्ती नसताना वाहन चालविले असता,वाहनाची नोंदणी केलेली नसताना, वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र विधीग्राह्य नसताना, वाहन चालविण्याकरिता आवश्यक परवाना नसताना,रस्त्यावर वाहन चालविताना आढळून आल्यास अशा वाहनास मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम २०७ नुसार अटकावून ठेवण्याचे किंवा जप्त करण्याचे अधिकार मोटार वाहन विभागातील अधिका-यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. याकरिता विभागातील अधिकारी जवळच्या पोलिस स्टेशन किंवा आर.टी.ओ. कार्यालयात मोटार वाहन अटकावून ठेऊ शकतात. वरील तरतुदीनुसार जप्त केलेले वाहन न्यायालयीन कारवाई झाल्यानंतर सोडण्यात येते. याकरिता वाहन जप्त केल्यानंतर ज्या कार्यालयाने वाहन जप्त केले आहे त्यांच्याकडे वाहन चालक/मालक यांनी न्यायालयीन कारवाईकरिता हजर राहून न्यायालयीन कारवाई पूर्ण केल्यानंतर वाहन सोडण्यात येते. जप्त केलेल्या वाहनासंदर्भात तडजोड शुल्क भरण्याची तरतुद कायद्यात आहे. यासाठी सक्षम अधिका-यांकडे अर्ज केल्यास तो अधिकारी त्यावर निर्णय घेऊन वाहन सोडू शकतो.

## अवैध प्रवासी वाहतुक

माल वाहतुकीसाठी असलेल्या वाहनांतून केली जाणारी प्रवासी वाहतूक किंवा योग्य परवान्याशिवाय प्रवासी भाडयाने घेऊन जाणे हे अवैध प्रवासी वाहतुकीच्या संज्ञेत येते. मोटार वाहन विभागातील अधिका-यांना अशी वाहने आढळून आल्यास अधिकारी ती जप्त करु शकतात. अशा जप्त वाहनांची सुपुर्दगी न्यायलयीन कार्यवाहीनंतर करण्यात येते. अवैध प्रवासी वाहतुक करणा-या वाहनांना अपघात झाल्यास प्रवाशांना किंवा वाहन मालकांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळू शकत नाही. यासाठी प्रवाशांनी आवश्यक प्रवासी परवाना असलेल्या वाहनातूनच प्रवास करणे योग्य आहे.